राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / १०६ / २०२५ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| रमेश सखाराम साळवी | जन माहिती अधिकारी, सह दुय्यम निबंधक हवेली क्र.१, खडकमाळ आळी, पुणे. | प्रथम अपिलीय अधिकारी, सह जिल्हा निबंधक कार्यालय, पुणे |

**( सुनावणी दिनांक - १७ / ०३ / २०२६ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. ०८.०१.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २५.१०.२०२४ | दस्त क्रमांक ४५६२ / ९३ प्रत मिळण्याबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, "दस्त मिळाला नाही."

जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, "अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०६.११.२०२४ रोजीच्या पत्राने दस्त क्रमांक ४५६२ / १९९३ या दस्ताचे शोधकार्य कार्यालयातील अभिलेख कक्षात चालू असून उक्त दस्त प्राप्त होताच अपिलार्थी यांना दस्ताची साक्षांकित प्रत देण्यात येईल," असे कळविले आहे.

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०६.११.२०२४ रोजीच्या पत्राने दस्ताचे शोधकार्य कार्यालयातील अभिलेख कक्षात चालू असून दस्त प्राप्त होताच अपिलार्थी यांना दस्ताची साक्षांकित प्रत देण्यात येईल, असे कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर कार्यवाही केली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून प्राप्त प्रथम अपील अर्जावर काम करताना महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६/(मा. अ.) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई दि. ०६ नोव्हेंबर २००७ व महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६/(मा.अ.) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई दि. १२ डिसेंबर २००७ अन्वये पारित परिपत्रकांनुसार कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा जन माहिती अधिकारी, सह दुय्यम निबंधक हवेली क्र.१, खडकमाळ आळी, पुणे. यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेल्या दस्ताचा शोध घेऊन आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.
2. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक कार्यालय पुणे, जि. पुणे यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. १०६ / २०२५ / पुणे 2634 | 2026 दिनांक - 5/6/2026.